# लवासा विमेन्स ड्राईव्हला विक्रमी प्रतिसाद देऊन २०११ महिलांनी प्रचंड उत्साहात साजरा केला आंतरराष्ट्रीय महिला दिन

**पुणे, २७ फेब्रुवारी, २०११:** आज सकाळच्या शांत, थंड वातावणात शेकडो महिला गोळीबार मैदानावर जमा झाल्या होत्या. निमित्त होते पहिल्यावहिल्या लवासा विमेन्स ड्राईव्हचे. उत्साहवर्धक हवामान, थेट मनाला साद घालणारे वारे असे रोमांचक वातावरणदेखील जुळून आले होते. प्रत्येक कारमध्ये क्वा नॅचरल मिनरल वॉटरने पुरविलेले पाणी व एलडब्ल्यूडी गीताची सीडी देण्यात आली होती. कितीतरी उत्साही स्पर्धकांनी आपआपल्या कार वेगवेगळ्या संकल्पनांनी सजविल्या होत्या. सजावटीबरोबरीनेच खास सामाजिक संदेशदेखील अनेक कारवर लिहीण्यात आले होते. मुलींची सुरक्षा, वाघाला नामशेष होण्यापासून वाचविणे, पाणी तसेच विजेची बचत हे व यासारखे इतरही अनेक संदेश पहायला मिळत होते.

गायक अभिजीत सावंत, पॅन्टलून्स फेमिना मिस इंडिया २००९ पूजा चोप्रा व अभिनेता नागेश भोसले यांनी पहिल्या कारला हिरवा झेंडा दाखविला. लवकर निदान करुन स्त्रियांना होणारे कर्करोग बरे करण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना मदत म्हणून लोकप्रिय टेलिव्हीजन अभिनेत्री नारायणी शास्त्रीने रोझी कार चालविली. यांच्या व्यतिरिक्त वेदिता व शिल्पा शुक्ला, भिंडी बझार या नवीन चित्रपटातील कलाकार व एशियन गेम्ससाठी भारतीय टेनिस संघाचे मुख्य कोच नंदन बाल या प्रख्यात व्यक्तींनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून त्याची रंगत वाढविली.

**पी. एन. गाडगीळ ज्वेलर्सचे भागीदार श्री. सौरभ गाडगीळ** यांनी सांगितले की, *लवासा विमेन्स ड्राईव्हसोबत जोडले गेलेले संबंध म्हणजे पीएनजीसाठी अतिशय आंनदाची व अभिमानाची बाब आहे. कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीवर आमचा ठाम विश्वास आहे व त्यामुळेच आम्ही या उपक्रमाला साथ देत आहोत.*

पुण्याच्या कॉन्क्रीटच्या जंगलातून निघून महिला स्पर्धकांनी अगदी चित्रातल्याप्रमाणे सुंदर दिसणाऱ्या लवासापर्यंत कार ड्राईव्ह केल्या. यासाठी त्यांनी त्यांना देण्यात आलेल्या ट्युलिट चार्टचे तसेच डब्ल्यूआयएएच्या नियमांचे पालन केले. हा संपूर्ण ड्राईव्ह वेळ-अंतर-वेग या पद्धतीने पार पाडण्यात आला. संपूर्ण प्रवास एलडब्ल्यूडी गीताच्या तालासूरांवर डोलत, गात अगदी मजेत झाला.

सर्व महिला स्पर्धकांचे अभिनंदन करण्यासाठी विवेक ओबेरॉय एका स्वॅन्की चॉपरमधून लवासामध्ये दाखल झाला होता. त्याला पाहून सर्व उपस्थित महिला खूष झाल्या नसत्या तरच नवल. लवासामध्ये अनेक कार्यक्रमांची रेलचेल होती - वॉटर स्पोर्टस्, चाट स्ट्रीट याबरोबरीनेच व्हीएलसीसीने खास महिलांसाठी मसाज कॉर्नर आयोजित केला होता. त्यामुळे श्रमपरिहार व मनोरंजन या दोन्ही गोष्टींचा मेळ बरोबर जुळून आला. याखेरीज शिबानी कश्यप व सुपास्टार्स यांनी आपल्या कलाकारीने उपस्थितांना खूष केले. स्त्रीशक्ती व महिला सबलीकरणाचा जागर असलेल्या एलडब्ल्यूडी गीताच्या नावीन्यपूर्ण सादरीकरणाने शिबानीने सर्वांची मने जिंकली.

भाग्यवान विजेत्यांना इतर अनेक आकर्षक बक्षिसांच्या बरोबरीनेच फॅरेनहीट हॉटेल्स ॲन्ड रिसॉर्टस्, गोवा यांची आकर्षक हॉलिडे पॅकेजेस्देखील देण्यात आली. सर्व्हायकल कॅन्सरवरच्या औषधांचे आघाडीचे उत्पादक एमएसडी फार्मास्युटीकल्सनेही एलडब्ल्यूडीला सहयोग प्रदान केला आहे.

**लवासा कॉर्पोरेशन लिमिटेडच्या मार्केटींग विभागाच्या वरिष्ठ उपाध्यक्षा श्रीमती अनुराधा पारसकर** यांनी सांगितले की, *मुंबई व पुण्याहुन लवासापर्यंत ड्राईव्ह करत आलेल्या २००० महिलांचे स्वागत करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. संगीताच्या तालावर डोलत, नृत्याचा मनमुराद आनंद लुटणाऱ्या सर्व स्त्रियांना पाहणे हा आमच्याकरता एक आगळावेगळा आनंद होता. परिपूर्ण जीवनाचे यथार्थ दर्शन आज या महिलांनी घडविले. हीच संकल्पना लवासा विमेन्स ड्राईव्हच्या अधिकृत गीताच्या शीर्षकातही मांडण्यात आली आहे. प्रभाव, उठावदारपणा, मूलभूत तत्वांचा अंगिकार व तरीही सामाजिक प्रश्नांबद्दलची कळकळ ही लवासा ब्रॅन्डची खास वैशिष्टये या संपूर्ण कार्यक्रमातही दिसून आली.*

बॉम्बे टाईम्स व लवासा कॉर्पोरेशन यांनी मिळून लवासा विमेन्स ड्राईव्हचे आयोजन केले होते.  वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशनच्या विमेन्स कॅन्सर इनिशिएटीव्ह टाटा मेमोरियल हॉस्पिटलनेही या उपक्रमाला साथ दिली आहे.  हा उपक्रम टाईम्स रेड सेलने चालविला आहे.

**अधिक माहितीकरता कृपया येथे संपर्क साधावाः**


| | |
|---|---|
| आनंद आर. अय्यर/सुचिता तुली<br>बेनेट, कोलमन ॲन्ड कंपनी लिमिटेड<br>मोबाईलः ९८६७१ ६९६७२ / ९८२०९ २४३८० | अश्विन शेट्टी / उमेश कोळमकर<br>लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड<br>मोबाईल : ९९६७०२४२९३ / ९८२१८५१३९९ |

| | |
|---|---|
| | जशोदा माधवजी / चिन्मय शाह<br>वैष्णवी कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स<br>मोबाईलः ९९८७२७४०२५/ ९८६७५५४१७३ |